MHRT080003992022

**नियमित दिवाणी दावा क्र.५२/२०२२**

**मधील निशाणी ६८ खालील आदेश**

वादीने सदरचा अर्ज हा आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल केलेला आहे. प्रस्तुतच्या अर्जात नमुद केल्याप्रमाणे वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. २२ श्री. प्रसन्न प्रदिप गद्रे यांचे दि. ०२/०२/२०२४ रोजी कोल्हापूर येथे निधन झाले. त्याच्या निधनानंतर प्रतिवादी क्र.२२अ,२२ब,२२क हे त्यांचे वारस आहेत. त्यांचे म्हणणे दाव्याकामी अभिलेखावर येणे अत्यंत गरजेचे आहे. सबब दाव्यामध्ये नि. १ येथे प्रतिवादी क्र. २२ यांच्या नावापुढे मयत असा उल्लेख करुन प्रतिवादी क्र. २२ यांच्या नावाखाली त्याचे प्रस्तावीत वारस यांची नावे नमुद करण्यास परवानगी मिळावी, याकरीता हा अर्ज केलेला आहे. अर्जाच्या पृष्टयर्थ नि.६९ येथे वादीने प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

**०२.** प्रतिवादी क्र. १ व ३ यांनी प्रस्तुत अर्जावर आपले लेखी म्हणणे देवून असे त्यांनी असे कथन केले की, प्रस्तुत वारस रेकॉर्डवर घेण्याच्या अर्जास न्यायच्या दृष्टीने योग्य ते आदेश पारीत करण्यात यावे.

**०३.** प्रस्तुतचा दावा स्पेसिफिक रिलीफ ॲक्ट कलम ३१ व ३४ प्रमाणे हक्कज्ञापन होवून मिळण्याकरीता दाखल झालेला आहे. वादी करु इच्छीत असलेली दावा दुरुस्ती केवळ औपचारीक आहे. त्यामुळे दाव्याच्या कोणत्याही स्वरुपात बदल होणार नाही. प्रतिवादी क्र. २२ चे मृत्यूप्रमाणपत्र कागदयादी नि. ७१/२ येथे दाखल केले आहे. त्याला **निशाण ७८** देण्यात येते. त्याच्या मृत्यूपश्चात प्रस्तावीत वारसांना दावा चालविण्याचा अधिकार आहे व त्याचे म्हणणे अभिलेखावर येणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. दाव्याची मागणी पाहता प्रस्तावीत दावा दुरूस्ती मंजूर झाल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणारे नाही. सबब अर्ज मंजूर करण्यास पात्र आहे. सबब

दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ६ रुल १७ प्रमाणे सदरची दावा दुरुस्ती मंजूर होण्यास पात्र आहे. सबब पुढील आदेश पारीत करण्यात येतो.

## - आदेश -

०१. अर्ज निशाणी ६८ मंजूर करण्यात येतो.

०२. प्र.वादी क्र. २२ यांच्या नावासमोर मयत असे नमुद करण्यास व वारस प्रस्तावित प्रतिवादी क्र. २२अ ते २२क असे लिहिण्यास परवानगी देण्यात येते.

०३. खर्चाची रक्कम रूपये १००/- न्यायालयात भरल्यानंतर सदरची दावा दुरुस्ती करण्यात यावी तसेच दुरुस्त दाव्याची प्रत त्वरीत अभिलेखावर दाखल करावी व त्याची प्रत विरुध्द पक्षास देणे.

०४. प्रतिवादी क्र. १३ यांचे प्रस्तावित वारसांना दाव्याकामी समन्स काढण्यात याव्यात.

**स्थळ - देवरुख**
**दि. ०६/१२/२०२४**

**(श्रुती ह. पाटील)**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर**
**देवरुख**

# -: CERTIFICATE :-

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | R.C.S. No. 52/2022 Exh.68 |
| I affirm that the contents of this pdf file Order are same word as per original Order. | | |
| Name of Jr. Clerk | : | T.N.Khade (Jr. clerk) |
| Court Name | : | Jt. Civil Judge,(J.D.) & J.M.F.C., Deorukh |
| Date of Decision | : | 06/12/2024 |
| Order signed by Presiding Officer on | : | 06/12/2024 |
| Order uploaded on | : | 06/12/2024 |